





स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक ११ | १ मे २०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11
संपादक : खासदार राजू शेट्टी



## ३० एप्रिल पासून 'स्वाभिमानी'ची

# संघर्ष यात्रा

## ७ मे रोजी दसरा चौकात मेळावा

**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने ३० एप्रिल पासून संघर्ष यात्रेस प्रांरभ होणार आहे. शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नी आसूड उगविण्यासाठी खासदार राजू शेट्टी यांनी विडा उचलला असून चांदोली धरणापासून या संघर्ष यात्रेस प्रांरभ होणार आहे,

३० एप्रिल रोजी चरण, ता. शिराळा येथे पहिला मुक्काम असणार आहे. दुसरा मुक्काम १ मे कोकरूड ता. शिराळा, ३ रा मुक्काम २ मे सवते मठ, चौथा मुक्काम ३ मे शिराळे, ५ वा मुक्काम ४ मे पैजारवाडी, ६ मुक्काम ५ मे पन्हाळा, ७ वा मुक्काम ६ मे निगवे खुर्द, ७ मे रोजी कोल्हापुरातील दसरा चौकात संघर्ष यात्रेची सांगता होणार आहे. तसेच दुसरीकडून संघर्ष यात्रा सदाभाऊ खोत, प्रा. डॉ. जालधंर पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघणार आहे. दि.३० रोजी राधानगरी धरणावरून यात्रेस प्रारंभ होणार आहे. दि. ३० एप्रिल रोजी तारळे येथे पहिला मुक्काम असणार आहे. दुसरा १ मे रोजी परिते येथे मुक्काम, तिसरा कोगे येथे २ मे रोजी मुक्काम, चौथा यवलूज येथे ३ मे रोजी मुक्काम, पाचवा ४ मे रोजी कंरजफेण येथे मुक्काम नंतर ५ मे रोजी पन्हाळा येथे मिसळणार आहे. असा या संघर्ष यात्रेचा मार्ग असणार आहे. उसाच्या दरासाठी यापूर्वी खासदार राजू शेट्टींनी ३८० किलोमिटरचा पायी प्रवास केला होता. याता ही दुसरी संघर्ष यात्रा असणार आहे.



शेतकरी संघटना स्वाभिमानी
स्वाभिमानी पक्ष

# सत्याग्रह पाण्याचा...पंचनामा भ्रष्टाचाराचा !







## महात्मा गांधींच्या स्वप्नातलं 'गाव' उध्वस्त झालं ! शेतकऱ्याचं प्वार हाटीलात फडकं मारू लागलं !!




## संघर्षयात्रेचा मार्ग

| खा. राजू शेट्टी यांची संघर्षयात्रा | सदाभाऊ खोत, जालिंदर पाटील यांची संघर्षयात्रा |
|---|---|
| ३० एप्रिल यात्रा आरंभ **चांदोली धरण** | ३० एप्रिल यात्रा आरंभ **राधानगरी धरण** |
| ३० एप्रिल मुक्काम **चरण** | ३० एप्रिल मुक्काम **तारळे** |
| १ मे मुक्काम **कोकरुड** | १ मे मुक्काम **परिते** |
| २ मे मुक्काम **सवते मठ** | २ मे मुक्काम **कोगे** |
| ३ मे मुक्काम **शिराळे** | ३ मे मुक्काम **यवलूज** |
| ४ मे मुक्काम **पैजारवाडी** | ४ मे मुक्काम **करंजफेण** |

**पन्हाळा** ५ मे मुक्काम
**निगवे** ६ मे मुक्काम
**कोल्हापूर** ७ मे यात्रा समाप्ती

## भूमिपुत्रांनो विचार करा...

पाणी आपलं - वाटणार सरकार
जमीन आपली - घेणार सरकार
पिक आपलं - दर ठरविणार सरकार
वीज आपली - पळविणार सरकार
कर आपला - उधळणार सरकार

## हतबल शेतकरी - निर्लज्ज सरकार

विस्थापितांचे पुनर्वसन आपल्या जमिनीवर ! उद्योगपती-राजकारण्यांचे इमले मलबार हील वर !!

## उचल एक पाऊल निर्धाराचं..चाल कर महाराष्ट्र देशा...कोल्हापूर कडं

आरंभ : दि. ३० एप्रिल २०११
चांदोली धरण, जि. सांगली
राधानगरी धरण, जि. कोल्हापूर

**भस्मासूर हा गाडू शाहूराजा पुढं..**

समाप्ती : दि. ७ मे २०११
दसरा चौक, कोल्हापूर

# हे सरकार...उद्योगपतींचे दलाल..शेतकरी हलाल !

# पाण्यासाठी संघर्ष

सरकारने नुकतेच विधानसभेत जलसंपत्ती विधेयक मंजूर केलं. शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचा सुलतानी निर्णय सरकारने घेतलेला होता. विरोधकांच्या दबावामुळे मुख्यमंत्र्यांनी मान टाकत प्रथम पिण्याला नंतर शेतीला त्यानंतर उद्योगाला पाणी असे धोरण जाहीर करावं लागलं. मात्र शेतकऱ्यांच्या पाण्यावर शेतकऱ्यांचेच हक्क नाही. हा कोणता न्याय?

जमिन शेतकऱ्याची असली तरीही त्यावर मालकी हक्क सरकार गाजवू पाहत आहे. निसर्गाच्या अवकृपेच्या दृष्टचक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या गळ्याचा घोट घेण्याचा निर्णय सरकारने घेतलेला दिसतो. किती नि किती वेळ हा अन्याय शेतकऱ्यांनी कशासाठी सहन करावा? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. मंत्रिगट एका रात्री विधेयक मंजूर करून उद्योगाला पाणी द्यायचा निर्णय घेताना शासनाला लाज कशी वाटत नाही. भिकार नेत्यांनी महाराष्ट्राची नि शेतकऱ्यांची तर वाट लावलेलीच आहे. यावर कहर म्हणून काय जलविधेयक सरकारने संमत केले. सरकार कोण चालवते हेच कळत नाही. भांडवलदारांच्या व उद्योगपतींच्या मोहाच्या जाळ्यात पैशाच्या हव्यासापोटी राज्य विकायला काढलेले निर्लज्ज नेते स्वतःला शेतकऱ्यांचे कैवारी (?) म्हणवून घेतात.

**संपादकीय**

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

मग पाण्यासाठी शेतकऱ्यांचा का बळी दिला जात आहे. शेतीसाठी राज्यात धरणे बांधण्यात आली. या जमिनी शेतकऱ्यांचीच आहेत. जागाही घेण्यात आली. मग शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी का टाळाटाळ केली जात आहे. उद्योगधंदे वाढावेत यामध्ये आमचं दुमत नाही. मात्र यासाठी शेतकऱ्यांचा बळी द्यायचा प्रयत्न झाल्यास हे कदापि सहन करणार नाही. राज्यातील अनेक धरणाचे सरकारने खासगीकरण केले आहे. लवासा च्या प्रकल्पासाठी मुळा नदीचा घोट घेण्यात आला. लवासाच्या बांधकामाला शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल किंमतीने पदरात पाडून घेण्यात आल्या. अब्जावधीं रूपये खर्च करून पवारांची स्वप्ननगरी बांधण्यात आली. एवढा पैसा आणला कोठून हा प्रश्न अनेकांना पडलेला आहे. राज्यातील अनेक प्रकल्पांना पाणी देण्यासाठी नदीचा मोठा वापर करण्यात येणार आहे. मग यासाठी शेतकऱ्यांचा बळी का दिला जात आहे. अनेक योजना बंद आहेत. त्या सुरू करण्यासाठी सरकारकडे पैसा नाही. मात्र उद्योगधंद्याना सवलती देण्यासाठी सरकारकडे पैसा आहे. हे आणखी किती दिवस चालायचे. म्हणूनच या सगळ्यांचा विरोध करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी ३० एप्रिलपासून होणाऱ्या स्वाभिमानीच्या संघर्ष यात्रेत सहभागी व्हा.

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक ११ ◆१ मे २०११ ◆ **संपादक** : खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com ◆ **कार्यकारी संपादक** : डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक** : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार ◆ **निवासी संपादक** : सदाभाऊ खोत ◆**मानद सल्लागार** : मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक** : सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय** : भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

# कर्ज फिटणार कधी?

कोल्हापूर : देशातील विकासाचे एक महत्वाचे केंद्र म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्रासारख्या राज्याच्या तिजोरीवर असलेला कर्जाचा बोजा वाढल्याने गेल्या काही वर्षातील धोरणात्मक गफलती उघड झाल्या आहेत. राज्याची आर्थिक अवस्था बडा घर पोकळ वासा अशी का झाली याबाबतचे चित्र महालेखापरिक्षकांनी काढलेल्या एक्सरे मध्ये काढलेले दिसले आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी एक्सरे सादर करण्यात आला. को सरकारी यंत्रणेनेच काढला असल्याने त्याबाबत कोणतीही संदिग्धता नाही. त्यामुळे सत्ताधारी आघाडीतील दोन्ही पक्ष त्याची गांभीर्याने दखल घेतील, अशी अपेक्षा आहे. देशातील विकसित राज्यांमध्ये सर्वाधिक परकी गुंतवणूक खेचणारे एकमेव राज्य हे महाराष्ट्राचे वैशिष्ठ्य. पायाभूत सुविधांचा दर्जा चांगला असल्याने उत्पादन उद्योगालाही येथे प्रकल्प उभारल्यास मनुष्यबळापासून ते नफा मिळविण्यापर्यंत अनेक बाबींची खात्री वाटते. ती खात्री अद्यापही काही प्रमाणात टिकून आहे. इतर विकसित राज्यांच्या तुलनेत महानगरांची वाढती संख्या हाही राज्याच्या प्रगतीचा एक मापदंड आहे. त्यामुळे केवळ उत्पादन उद्योगांचाच विस्तार होतो असे नव्हे. तर त्या अनुषंगाने सेवाउद्योगही विस्तारतो. मात्र सरकारने भराभर कर्जे उभारून राज्यावर अस्मानी संकट उभारले आहे. कर्जाचा बोजा पाहिल्या वसंतदादांनी पाहिलेला स्वप्नातला महाराष्ट्र खरोखर हाच आहे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.


TEXMO INDUSTRIES
TEXMO
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स्
BCH स्टार्टर



अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/२४३४१०८
मोबा. : ● विपुल – ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९



प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



Shree Datta
Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

# सज्जनांनी संघटितपणे दुर्जनांशी लढावे

## खासदार शेट्टी : भगवान अहिंसा गौरव पुरस्काराचे वितरण

कोल्हापूर : दुर्जन नेहमीच संघटित असतात; तर सज्जन असंघटित असतात. त्यामुळे दुर्जन समाजाला वेठीस धरतात. सज्जनांनी लढण्याची तयारी ठेवून एकजूट करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी आज येथे केले. भगवान महावीर अहिंसा गौरव पुरस्कार वितरण समारंभात ते अध्यक्षपदावरून बोलत होते.

महावीर जयंतीनिमित्त येथील जिनधर्म माता शालिनीदेवी चिंताम णी कापसे मानवधर्म सेवा प्रतिष्ठान व भारतवर्षीय दिगंबर जैन महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने या पुरस्कारांचे आज वितरण करण्यात आले. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे झालेल्या कार्यक्रमात बोलताना खासदार शेट्टी म्हणाले, ''समाजातील महिलांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊ लागली आहे. स्त्री-भ्रूणहत्येमुळे महिलांची संख्या कमी होत आहे. त्याचा परिणाम म्हणून भविष्यात एक सामाजिक प्रश्न निर्माण होईल. समाजात विषमता निर्माण होण्याची भीती आहे. भगवान महावीर यांच्या अहिंसा या तत्त्वाच्या आधारे स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.''

ते म्हणाले, ''रोज एक घोटाळा उघडकीस येत आहे आणि दुसरीकडे सामान्यांना हव्या असलेल्या सेवा सुविधा मिळत नाहीत. सर्वसामान्य माणूस कर देऊन शासनाची तिजोरी भरतो आहे. पण सामान्याचे प्रश्न सोडवायला शासनाकडे कधीच निधी नसतो.''

या वेळी नर्मदा बचाव समितीच्या नेत्या मेधा पाटकर यांनी दूरध्वनीवरून पुरस्काराबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली. विकासाच्या नावाखाली लोकांवर अन्याय केला जात आहे. संस्कृती नष्ट केली जात आहे. कमी विनाश व कमीत कमी विषमता निर्माण करणाऱ्या विकासाची गरज आहे. या व्यापक लढ्यात तरुणांनी किमान एक वर्ष तरी द्यावे व प्रत्येकाने आपला आवाज मिळेल त्या माध्यमातून संबंधितांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन त्यांनी केले.'' पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली असून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी 'जिओ और जिने दो' मानवधर्म अहिंसा गौरव हा पहिला पुरस्कार जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांना खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मेधा पाटकर यांच्या वतीने त्यांचे कार्यकर्ते योगिनी खानोलकर व मांगल्या पावऱ्या यांनी पुरस्कार स्वीकारला. विश्वधर्म शाकाहार गौरव पुरस्कार डॉ. कल्याण गंगवाल यांना प्रदान करण्यात आला. पंचपरमेष्टी भगवान महावीर जिनधर्म सेवा जीवन गौरव पुरस्कार प्रा. डॉ. विलास संगवे यांचा (मरणोत्तर) पुरस्कार त्यांचे चिरंजीव अभिनंदन संगवे यांनी स्वीकारला. याशिवाय आर. जे. शहा, गणपतराव रोटे यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनेकान्त भगवान महावीर मानव धर्म सेवा गौरव पुरस्कार आमदार राजेश क्षीरसागर यांच्या हस्ते देऊन उदय गायकवाड, अशोक रोकडे, दिलीप देसाई, श्रीमती अनुराधा गुरव, प्राचार्य पवन खेबुडकर, इंद्रजित सावंत, विनोद कांबोज, दिनकर कांबळे, सुनील माने व आरोग्य निरीक्षक नारायण आकुलवार यांना गौरवण्यात आले.

शाकाहार गौरव पुरस्कार देऊन श्रीमती जयश्री शिंदे, अनिल जाधव, कुमारी सिमरन जमादार यांना सन्मानित करण्यात आले. नगरसेवक किरण शिरोळे, नगरसेविका तृप्ती माळवी, महिला बालकल्याण समिती सभापती अर्चना आडके, नगरसेवक राजू लाटकर यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला.

या वेळी स्वस्तिश्री लक्ष्मीसेन महास्वामीजी यांनी भगवान महावीर यांच्या अहिंसा, सत्य, अचौर्य, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य या तत्त्वाचे आचरण करण्याचे आवाहन केले.

जिल्हाधिकारी लक्ष्मीकांत देशमुख यांनी पुरस्कारामुळे काम करण्याची अधिक ऊर्जा मिळाल्याचे सांगितले. डॉ. कल्याण गंगवाल यांनी 'सुखी जीवनाचा मूलमंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. दिनकर कांबळे यांच्या एका जीवरक्षकाची धैर्यगाथा या सीडीचे प्रकाशनही या वेळी करण्यात आले.

स्वागत व प्रास्ताविक पद्माकर कापसे यांनी केले. स्वागत गीत सौ. पद्मिनी कापसे यांनी सादर केले. कार्यक्रमाला डॉ. धनंजय गुंडे यांनी आभार मानले.


**श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर**

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

**श्री. व्ही. बी. हुग्गे.** बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

**श्री. अशोक शां रूणवाळ.** बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक

**पै. विठ्ठल बाबूराव मोरे** एम. ए. चेअरमन




# शेतकरी पॅकेज पोखरणारे **१९ अधिकारी निलंबित**

देशमुख कृषी विद्यापीठ अपयशी ठरले, हे दुर्दैव आहे. आत्महत्या रोखण्यासाठी आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांचे शेतीव्यवसायातून पुनर्वसन, त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी मॉडेल तयार करणार असल्याची माहिती त्यांनी शेतमालास हमीभाव सिंचन सुविधा पुरविणे. प्रादेशिक गरजेनुसार शेतकऱ्यांना अवजारे देणे आदी उपाययोजना त्यात समावेश राहणार असल्याचे विखे- पाटील यांनी सांगितले.

नागपूरः विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी जाहीर झालेल्या पंतप्रधान पॅकेजमधील गैरव्यवहारात दोषी आढळलेल्या ७७ पैकी १९ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. गैरव्यवहार सिध्द झाल्यास त्या अधिकाऱ्यांवर सक्तीची निवृत्ती, वेतनवाढ रोखणे आदी कारवाई केली जाणार असल्याची माहिती कृषिमंत्री राधाकृष्ण - विखे पाटील यांनी दिली, पॅकेजमधील अवज-ारे वाटपात गैरव्यवहार उघडकीस आल्यावर प्राथमिक स्तरावर ४०५ अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली. त्यापैकी ७७ अधिकारी दोषी आ-ढळून आलेत. पैकी १९ अधिकाऱ्यांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले आहेत. या सर्व अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी केली जाणार असून त्यांची वेतनवाढ रोखली जाईल. हा गंभार आरोप सिध्द झाल्यास त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात येणार असल्याचेही कृषिमंत्र्यांनी सांगितले. अवजारांच्या गुणवत्तेबाबत कृषी औद्योगिक महामंडळाकडून खुल-ासा मागविण्यात आला. तो पाहून एक महिन्याच्या आत त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित करण्यात आल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी डॉ. पंजाबराव



# राज्यातील पाच लाख हेक्टर वनजमीन गायब



नागपूरः गेल्या बारा वर्षात महाराष्ट्रातील पाच लाख हेक्टर वनजमीन गायब झाली असल्याची धक्कादायक माहिती वसुंधरा दिनाच्या पार्श्वभूमीवर पुढे आली आहे. १९९७ साली ६६ हजार ९१५ हेक्टरवर पसरलेले वन-क्षेत्र २००८ साली मात्र ६१ हजार ९३९ हेक्टरवर इतके कमी झाले. ही आकडेवारी दस्तुरखुद्द वनविभागानेच प्रसृत केली आहे. ही जागा गेली कुठे? जागा हडपणाऱ्यावर कुठल्या नियमाने कारवाई झाली? हा प्रश्न मात्र गुलदस्त्यातच आहेत.

राज्य शासनाने गोदावरम प्रकरणी १९९७ मध्ये सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात महाराष्ट्रात ४२७२२ चौ. कि. मी, राखीव वन, १६ हजार ३५१ चौ.कि. मी. संरक्षित वन आणि पाच हजार ९९७ चौ. कि. मी. अवर्गीकृत वन असे एकूण ६१ हजार ९३९ चौ. कि, मी. वनजमीन शिल्लक असल्याचे वनविभागाने म्हटले आहे. याचाच अर्थ राज्यातील एक हजार ९३३ चौ. कि. मी, जमीन म्हणजेच चार लाख ९७६ चौरस किलोमिटर वनक्षेत्र गायब झाले असल्याचे स्पष्ट होते. विशेष म्हणजे ही जमिन कमी का झाली. याचा खुलासा वनविभागाच्या कोणत्याही अहवालात करण्यात आलेला नाही.

पश्चिम घाटात ६३ हजार चौरस किलोमिटर वनक्षेत्र आहे. त्यातील १७.२५ टक्केच भाव वनाच्छादीत आहे. वनधोरणानुसार घाटावरील भागात ६० टक्के वनाच्छादित असणे आवश्यक आहे. ती व्याप्ती कमी आहे. काश्मीर आणि महाराष्ट्र वगळता सर्वच राज्याच्या घाटावरील भागात वनक्षेत्र चांगले आहे. महाराष्ट्रात वनाच्छादित क्षेत्र कमी असल्यामुळे पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे, याशिवाय सातारा, सांगली आदी जिल्ह्यांत १०० मिमी पेक्षा कमी पाऊस पडतो. रोज घरगुती वापरासाठी वृक्षांचा वापर ५५ हजार टन, सरासरी दररोज ३६ हजार पूर्ण वाढलेल्या वृक्षांची तोड, वर्षभरात १ कोटी ३१ लाख ४० हजार वृक्षांची तोड.

## कुठे गेला कायदा?

१९९६ च्या आदिवासी कायद्यानुसार वनजमिनींचा उपयोग वनेतर कामासाठी केल्यास तो वनसंवर्धन अधिनियम १९८० कलम दोनचा भंग ठरतो. तो भारतीय वनअधिनियम १९२७ मधील कलम ६५ अन्वये दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. राज्यातील इतकी वनजमीन बेपत्ता झाली तरी कायद्याचा वापर का केला जात नाही हा मूळ प्रश्न आहे.







# जागतिकीकरणानंतरही शेतकरी कंगालच

खासदार राजू शेट्टी

सोलापूरः जागतिकीकरणानंतर शेतकऱ्याची आर्थिक पद सुधारण्याची आशा होती. परंतु जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांचा फायदा तर झाला नाहीच, उलट शेतकरी अधिकाधिक कंगालच होत गेला असा सूर लोकमंगल कृषी साहित्य संमेलनात सूर उमटला. लोकमंगल प्रतिष्ठान आयोजीत लोकमंगल कृषी साहित्य संमेलनात जागतिकीकणरनंतरची शेती आणि शेतकरी याविषयावर आयोजीत केलेल्या परिसंवादात खासदार राजू शेट्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, तसेच महाराष्ट्र एम. डी. असोसिएशनचे अध्यक्ष के. एन. निबे यांनी आपली मते मांडली. यावेळी व्यासपीठावर रोहन देशमुख, कार्यवाहक मनोज गायकवाड विजय जाधव, रामचंद्र गवळी उपस्थित होते.

यावेळी खासदार राजू शेट्टी म्हणाले, जागतिकीकरणानंतर शेतकरी नियत्रंणमुक्त होणे अपेक्षितच होते. पण खऱ्या अर्थाने जागतिकीकरणाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेच नाहीत.जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांचा फायदाा झालेला नाही, असे खोटे चित्र धनदांडग्याकडून उभे करण्यात आले आहे. शेतकरी हा बाजारपेठेवर बरोबर निसर्गाच्या लहरीवर देखील अवलंबून असतो. गुंतवणूक आणि मालाच्या विक्रीनंतर मिळालेला पैसा याचे ताळमेळ बसत नाही. भाववाढीनंतर शेतकऱ्यांना कधीच फायदा होत नाही. सर्व फायदा व्यापारीच लुटतात. शेतकऱ्यांचा माल स्वस्तात घेण्याचे व्यसन या संघटित चोरांना लागलेले असून सरकारवरही याचा दबाव आहे. असे शेट्टी म्हणाले, गेल्या साठ वर्षात राजकारण्यांकडून धोरण ठरविताना शेतकऱ्यांचा विश्वास घात करण्यात आ-लेला आहे. चार आणे चलनात नसतानाही कोथबिरीची पेंडी चार आण्यात मानणारे धनदांडगे सौंदर्य प्रसाधने मोठ्या किंमतीत निमूटपणे खरेदी करतात. असे ते म्हणाले. व्यापाऱ्याप्रमाणे दूध माफियांनीही राज्यात हैदोस घातलेला आहे. दुधात भेसळ आणि दूध वाढीला होणारा विरोध कायम राहिल्यास आगामी काळात दूध सत्तर रूपये लिटर दराने खरेदी करावी लागेल, अशी भिती खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केली. राज्यातील सहकारी साखर कारखानदारी भ्रष्टाचारामुळे रसातळाला चालल्याचे खासदार शेट्टी म्हणाले. या साखर सम्राटांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर घोर अन्याय केला असून आपल्या आई वडिलांची थडगेही शेतकऱ्यांच्या बिलात कपात करून बांधल्याची घणाघती आरोप खासदार राजू शेट्टी यांनी केला. अरविंद जोशी म्हणाले, १९९० नंतर अर्थव्यवस्था काही प्रमाणात बदलली. उद्योजकाच्या दबावामुळे शेती मालाचे निर्यात करण्याची सरकारची तयारी नाही. यंदाच्या वर्षी ८कोटी ८० लाख टन गव्हाचे उत्पादन झाले. परंतु अतरिक्त गहू निर्यात न केल्यामुळे सडत आहे. जागतिकीकरणामुळे मजुरांचे दर वाढले. उत्पादन खर्च वाढला. पण शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळालेला नाही.

पान ९ वर ▸

# 'इंडिया बुल्स'साठी जलविधेयक

## ६० हजार हेक्टर सिंचन क्षेत्राला फटका बसणार



**जयसिंगपूर(स्वाभिमानी वृत्तसेवा)**: राज्य शासनाने नुकतेच संमत केलेल्या जलविधेयकाचे भूत शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसणार असून राज्यातील तब्बल ६० हजार एकर क्षेत्र बिगर सिंचन होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

राज्य सरकारने एका रात्रीत जलविधेयक संमत केले. यावरून वादंग होण्याची शक्यता निर्माण झाल्यावर मुख्यमंत्र्यांनी सारवासारव करीत शेतीला प्राधान्य देऊ असे आश्वासन त्यांनी दिले. नुकतेच विधानसभेतही जलविधेयक मंजूर केले आहे. वास्तविक पाण्यावर शेतकऱ्यांचाच हक्क असताना मंत्रिगटाने एका रात्रीत उद्योगाला पाण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल, असा ठराव करण्यात आला. हा ठराव समजल्यावर शेतकऱ्यांच्या तोंडाचे पाणीच पळाले. एकीकडे राज्यातील हजारो एकरातील पिके पाण्याअभावी तडफडली जात असताना शेतीचे पाणी उद्योगाकडे वळविण्याचा घाट राष्ट्रवादीच्या दादांनी घातला. पाणी कोणाला द्यायचे नि कोणाला नाही? याचा अधिकार मंत्रिगटाकडे घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी मंत्रिगट ठरवणार की कोणाला किती पाणी द्यायचे. किती नाही?

सिन्नर एमआयडीसीतील इंडिया बुल्स कंपनीला पाणी देताना जलसिंचन प्राधिकरणाने अडथळ्यांचा डोंगर उभा केला. त्याला पाणी देताना या जलविधेयकामध्ये अट शिथिल करण्यात आली असल्याची टिका विरोधकांनी केलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी धरणे बांधण्यात आली. या धरणांसाठी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या. मात्र त्यांचा हक्क आता उद्योगधंद्यांना देण्याचा घाट राज्यकर्त्यांनी घातलेला आहे. नेमके पाणी कुठे मुरते आहे. याचेच कोडे आता हळूहळू उलगडलेले आहे. राज्यात

पान ९ वर ▸

# जागतिकीकरणानंतरही शेतकरी कंगालच

▶ पान ७ वरुन

जागतिकीकरणाच्या माध्यमातून शेतीला उद्य-ोगाचा दर्जा मिळेल असे अपेक्षित असताना तो न मिळाल्याने शेतकरी कंगाल झाल्याचे अरविंद जोशी यांनी सांगितले. तर शेतकऱ्याच्या दुरवस्-थेला शेतकरीच काही प्रमाणात जबाबदार आहे. असे सदाभाऊ खोत यांनी सांगितले. शेतकऱ्याच्या बाजूने बोलणाऱ्या नेत्याची निवड न करता आल्याने शेतकऱ्यावर ही वेळ ओढवल असल्याचे खोत हे म्हणाले. केवळ अधिक उत्प झाल्यानेच शेतकऱ्याची आर्थिक पत सुधारणे श नाही. शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळून जोपर्यंत त्याची आर्थिक सुधारत नाही. तोपर्यंत शेतकऱ्याच्या आत्महत्याचे सत्र सुरूच राहणार असल्याचे खोत यांनी मांडले. यावेळी संमेलना अध्यक्ष कवी विठ्ठव वाघ, स्वागताध्यक्ष व माजी खासदार देशमुख, अण्णासाहेब कोथली आदी उपस्थित होते.



# 'इंडिया बुल्स'साठी जलविधेयक

▶ पान ८ वरुन

एकावर एक घोटाळे बाहेर पडत आ-हेत. असे असताना सरकारने एकही ठोस पावले सुधारण्यासाठी उचललेली नाहीत. जनतेच्या डोक्यावर अंगारा घालण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यातील धरणांतील पाणी शेतकऱ्यांना दिले गेले पाहिजे एवढीच आशा सरकार व्यक्त करते. यापलिकडे सरकार काहीही करू शकत नाही. शेतकऱ्यांना पाणी देताना पाणीपट्टी नगण्य लावली जाते. अर्थात शेतकऱ्यांच्यावर फार उपकार करतात अशातला भाग मुळीच नाही. शेतकऱ्यांच्या दृष्टीने जेवढे पाणी उपलब्ध आहे तितकेच वीज उपलब्ध असायला हवी, उद्योगांना जास्त दराने २४ तास वीज पुरवठा केला जातो. कारण उद्योगधंद्यांना ते परवडत असते. शेतकऱ्यांना नेहमी नैसर्गिक संकाटाचा सामना करावा लागतो. महापूर, ऊन, वारा, पाऊस, रोगराई, बाजारातील चढउतार याचा मोठा फटका शेतकरी वर्गाला बसत असतो. मात्र उद्योगधंद्यांना यामधील काहीच फटका बसताना दिसत नाही. शेतीला पाणी द्यायचे सोडून उद्योगांना पाणी द्यायचा घाट सरकारने घातलेला आहे. कारण यामधून त्यांना पैसा कमवायचा आहे. यामधून त्यांची आर्थिक उन्नती होणार आहे. मात्र हा निर्णय शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसणार आहे. उद्या पाण्याठी संघर्ष करावा लागणार आहे. हे मात्र निश्चित.




# काळ्या पैशाचा निश्चित आकडा नाही

## अर्थमंत्रालयाची माहिती

नवी दिल्लीः परदेशातील बँकात काळा पैसा ठेवणाऱ्या लोकांची नावे जाहीर करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाकडून दबाव येत असताना स्वीस बँक व इतर परदेशी बँकांत किती पैसा दडविण्यात आलेला आहे. याचा निश्चित आकडा आपल्याकडे नाही, असे अर्थम ंत्रालयाने जाहीर केले आहे. स्वीस बँकेत भारतीय नागरिकांनी ठेवलेल्या पैशाबाबत काही निश्चित माहिती मिळाली आहे, पण ती जाहीर करणे शक्य नाही, तसे केल्यास चौकशीच्या प्रक्रियेत अडसर निर्माण होतील, असे अर्थमंत्रलायाने स्पष्ट केले आहे.

या प्रकरणावर सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. त्यामुळे या चौकशीत बाधा येईल असे काही करता येत नाही. अर्थमंत्रालयाने माहिती अधिकाराखाली चौकशी केल्यास हे उत्तर दिले आहे. पण चौकशीच्या या टप्प्यात ती उघड करणे मात्र शक्य नाही. से आरटीआय कायदा २००५ च्या कलम ८(१) नुसार करण्यात आलेल्या चौकशीस उत्तर गेताना अर्थमंत्रालयाने म्हटले आहे. स्वीस बँकेत पैसे ठेवणाऱ्या व्यक्ती व कंपन्यांची नावे सांगा व त्यांनी ठेवलेला पैसा नक्की किती आहे याची माहिती द्या, अशी मागणी याचिकाव्दारे केली होती.





# विदर्भातील तरुणी सरपंच

**विदर्भातील दीप्ती वानखेडे ही तरूणी एम एस्सी झालेली आहे. अमरावती जिल्ह्या-तील विरूळ या छोट्या खेड्याची ती सरपंच आहे. तिला शेतीच्या माध्यमातून गाव बदलायचे आहे. गी लवकरच पुढील अभ्यासासाठी नेदरलँडला जाते आहे.**

नागपूरः विदर्भातील तिला आपल्या गावाला बदलायचे आहे. गावातील शेती बदलून गावकऱ्यांना समृध्दीच्या दिशेने न्यायचे आहे. त्यासाठी असलेल्या विविध सरकारी योजनांचे लाभ घ्यायला ते आ-तुरले आहेत. त्याचबरोबर काळानुसार त्यांच्या अधिकारांमध्ये, भूमिकांमध्ये काही बदल करण्याचीही निकड जाणवते आहे. आरक्षणामुळे अनेक गावांत महिलांसह समाजाच्या सर्वच स्तरांतील लोक सत्तेत आले आहेत. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची कामे सोडून ते स्वच्छ देणे गरजेचे आहे. भ्रष्टाचाराला आळा बसण्यासाठी काही प्रमाणात का होईना त्याची मदत निश्चित होईल. त्यांना लॅपटॉप, कनेक्टीव्हीटी दिली पाहिजे. कारण देशभर सुरू असलेल्या संपर्कक्रांतीतून त्यांना वगळणे दीर्घकाळाच्या विकास प्रक्रियेचा विचार करता महागात पडले हे नक्की. त्याचबरोबर त्यांना कार्यक्षम प्रशासनाचे चांगले प्रशिक्षणही दिले पाहिजे. ते नसल्याने अनेक सरपंच ग्रामसेवकांच्या हातातले बाहुले बनले आहेत. सरपंचांमध्ये नवे काही तरी शिकण्याची उमेद आहे. त्यासाठी ते उत्सुक आहेत.

# स्वाभिमानीची आता पाणी सत्याग्रह संघर्ष यात्रा

## खासदार राजू शेट्टी

**जयसिंगपूरः** स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या निर्धार यात्रेनंतर आता दि. ३० एप्रिल ते ७ मे अखेर सत्याग्रह पाण्याचा, पंचनामा भ्रष्टाचाराचा अशी संघर्ष यात्रा काढण्यात येणार आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग होण्याचे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी दिली.

संघर्ष यात्रेच्या पूर्वतयारीसाठी भोगावती व बिद्री साखर कारखाना परिसरातील स्वाभिमानीच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलविण्यात आलेली होती. त्यावेळी खासदार राजू शेट्टींनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, शेट्टी म्हणाले, भ्रष्टाचारी पुढाऱ्याप्रमाणे केवळ भाषणे करण्यापेक्षा मी प्रत्यक्ष काम करून दाखविणार आहे. जाचक अटीमुळे मी साखर कारखाना उभा करू शकलो नसलो तरी दुधाचे अवघड काम मी सुरू के लो आहे. राधानगरी धरण राजर्षि शाहू राजांनी व चांदोली धरणाचा पहिला मातीचा बंधारा वंसतदादांनी शेतकऱ्यांसाठई बांधलेला आहे. म्हणून संघर्ष यात्रेची सुरूवात येथूनच होणार आहे. चांदोलीतून माझ्या नेतृत्वाखाली पाणी कलश घेऊन पदयात्रा चरण, कोकरूड सवते, शिराळा, पैजारवाडीमार्गे पन्हाळा येथे ५ मे रोजी येईल. तर राधानगरीतून पाणी कलश घेऊन सदाभाऊ खोत व प्रा. जालंधर पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदयात्रा तारळे, परिते, कोगे. यवलूज कंरजफेणमार्गे ५ मे रोजी पन्हाळा येथे मिळेल. तेथे रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करून पदयात्रा निगवेमार्गे कोल्हापूर येथे ७ रोजी येईल. दसरा चौकातील शाहू महाराज पुतळ्याला जलाभिषेक करून पदयात्रेचा समारोप होणार आहे.

दररोज दोन हजार कार्यकर्ते या यात्रेत सहभागी होणार आहेत. पन्हाळ्यातून सुमारे ५० हजार लोकांची संघर्ष यात्रा कोल्हापुरच्या ऐतिहासिक दसरा चौकात दाखल होईल असा विश्वास शेट्टी यांनी व्यक्त केला. प्रास्ताविक अजित पवार यांनी केले. प्रा.जालधंर पाटील व भगवान काटे यांची भाषणे झाली. यावेळी जनार्दन पाटील, वासुदेव पाटील, बाळासो पाटील, बाबूराव कोथळकर, शारदा कोईंगडे, विलास पाटील, बाबूराव पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# 'एंडोसल्फान'वर बंदी

नवी दिल्ली(वृतसंस्था) आरोग्यावर विपरीत परिणाम होताना आढलल्यास एंडोसल्फान या किटकनाशकांवर बंदी घालण्यात येईल अशी माहिती केंद्रीय पर्यावरणमंत्री जयराम नरेश यांनी दिली आहे.

एका समारंभात पत्रकारांशी बोलताना जयराम नरेश म्हणाले की, केरळ सरकारने एंडोसल्फान या किटकनाशकावर बंदी घातलेली आहे. या निर्णयाचा आपण आदर करतो. एंडोसल्फ ानमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे पुरावे आढळून आल्यास यावर त्वरीत देशव्यापी बंदी घालण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.




शी! मला वाटतं आपली सारी व्यवस्थाच कुठल्यातरी डंपिंग ग्राउंडखाली गाडली गेली असावी!!

# राज्याला यंदा चार लाख मेट्रिक टन जादा खते




कोल्हापूरः राज्याला यंदा गेल्यावर्षीपेक्षा चार लाख मेट्रिक टन जादा रासायनिक खते मिळणार असल्याची माहिती कृषी आयुक्तालयातील खते विभागाचे उपसंचालक किशोर डेरे यांनी दिली. दरम्यान, प्रत्येक संस्था, दुकानदारांना खतांच्या उपलब्धतेच्या फलकाची सक्ती करण्यात येणार आहे.

यंदा ४३ लाख मेट्रिक टन खते मिळणार आहेत. त्यात १५ लाख मेट्रिक टन युरिया, १० लाख ७५ हजार मेट्रिक टन डीएपी, नऊ लाख मेट्रिक टन संयुक्त खते, तीन लाख २५ हजार टन पोटॅश, ४ लाख ५० हजार टन फॉस्फेट व ५० हजार डीएपी व फॉस्फेट या खतांचा एकत्रित तीन लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढीव पुरवठा होणार आहे. यंदापासून बनवाबनवी झाल्यास किंवा संशय आल्यास त्याची माहिती प्रशासनाला लागलीच कळविता यावी यासाठी त्या फलकावर कृषी विभागाच टोल फ्री क्रमांक असणार आहे.

# विनाशाच्या वाटेवर सहकार क्षेत्र



नगर : नागरी सहकारी बँकेवर ज्याप्रमाणे आसूड ओढते आणि त्या बँकांचे तत्परतेने विलीनीकरण करते किंवा तिचा परवाना जसा रद्द करते तशीच कारवाई इतर ठिकाणी करताना दिसत नाही. केंद्रीय मंत्रिमंडळाने रिझर्व्ह बँकेला जादा अधिकार देणारे विधेयक तयार केल असून, ते नुकतेच मंत्रिमंडळाच्या बैठकीत संमत करण्यात आलेले आहे. परंतु या जादा अधिकारांचा वापर नागरी सहकारी बँकांवरच कारवाई करण्यासाठी होईल काय? अहमदाबादच्या माधवपुरा बँकेचा घोटाळा होऊन १० - १२ वर्षे झाली. त्यानंतर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. तरीसुध्दा आज सहकार क्षेत्राचे आणि मुख्यतः नागरी सहकारी बँकांचे विरोधक आणि रिझर्व्ह बँकेचे आजी - माजी अधिकारी आजही माधवपुराचा घोटाळा उगाळीत बसले आहेत. व्यापारी बँकांतील राष्ट्रीयकृत बँका २६ असूनम खासगी क्षेत्रातील बँकांची संख्या २२ असून विदेशी बँका ३४ आहेत.सहकार वाचविण्याचे एकाकडूनही प्रयत्न केले जात नाहीत. रिझर्व्ह बँकेने अनेक धोरणे अवलबंली असली तरी त्याचा उपयोग मात्र होताना दिसत नाही. सहकार क्षेत्राची अधोगती दिवसेंदिवस खालावली जात आहे. त्याचा मोठा फटका बँकांना बसत आहे. पर्यायाने शेतकरी वर्ग यामध्ये होपरळून निघत आहे.

# ऊसाच्या लागवडीमुळे तापमान नियंत्रित

मुबई : जगाला वाढत्या तापमानाची चिता लागली असताना उसाचे पीक हे तापमान नियंत्रित ठेवण्यात मोलाचे योगदान देऊ शकते, असा शोध शास्त्रज्ञांना लागल्याने पश्चिम महाराष्ट्रातील साखरपट्टा हा वाढत्या तापमानाच्या झळांपासून चिंतामुक्त होऊ शकणार आहे.

एकेकाळी उसाच्या बाबतील अग्रक्रमांकावर असणाऱ्या नगर जिल्ह्यांपेक्षा पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर,सांगली, कोल्हापूर, सातारा व पुणे या पाच जिल्ह्यांत उसाचे क्षेत्र वाढू लागले असून, उसाचे वाढते क्षेत्र हे या परिसराला वाढत्या तापमानापासून मुक्त करण्यास अनुकूल ठरत असल्याचे आढळून आले आहे. जगाला वाढत्या तापमानाची चिंता लागली असताना ब्राझील या ऊससंपन्न देशातील एका संस्थेने यावर संशोधन केले असून, त्यांच्या मते उसाची लागवड किंवा त्यापासून तयार होणारे उपपदार्थ हे जगाला तापमानापासून मुक्त करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. महाराष्ट्रातील विदर्भ, खान्देश हे दोन प्रदेश सर्वात उष्ण म्हणून गणले जाऊ लागले आहेत. त्याखालोखाल मराठवाड्याचे तापमान असते. मात्र पश्चिम महाराष्ट्रातील साखरपट्टा समजले जाणारे जिल्हे त्यामानाने कमी तापतात. असे आढळून आलेले आहे. त्यामागे उसाचे वाढते क्षेत्र हेच कारण आहे. असे आता या संशोधनामुळे म्हणता येईल.



जागतिक पर्यावरण खात्याच्या कार्नेजी इन्स्टिट्यूटच्या शास्त्रज्ञांनी हे संशोधन केले आहे. ब्राझीलमध्ये उसाचे क्षेत्र वाढण्यापूर्वी आणि क्षेत्र वाढल्यानंतरच्या नोंदी त्यांनी ठेवल्या आहेत. तसेच उसाचा परिसर व इतर पिकांचा परिसर याच्याही तापमानाच्या नोंदी त्यांनी ठेवल्या आहेत. ब्राझीलमध्ये इंधन म्हणूनही उसापासून बनविणाऱ्या उपपदार्थांचा प्रामुख्याने वापर करतात. त्यामुळे हवेत कमी प्रमाणात कार्बन सोडला जातो. त्यामुळे ब्राझीलमध्ये तापमानावर नियत्रंण राहिले आहे.

शास्त्रज्ञांच्या मते सूर्यापासून येणारी किरणे उसाच्या पानावरून परावर्तीत होताना थंड होऊन ती हवेत पसरतात. त्यामुळे तापमान कमी होते. तसेच उसाच्या दोन ओळीमध्ये योग्य अंतर असेल तर त्या ओळींतून वाहणारी हवा ही थंड होऊनच बाहेर पडते आणि एकदंरीत तापमान कमी करण्यास मदत होते. उसाच्या लागवड क्षेत्रातील आणि इतर पिकांच्या लावगड क्षेत्रातील तापमानाचा अभ्यास केला असता. ०.९३ अंश सेल्सिअस इतके कमी असल्याचे आढळून आलेले आहे. याशिवाय या परिसरात असणाऱ्या वाहनांना उसापासून तयार केलेले इथेनॉलसारखे इंधने वापरल्यास दोन्हींचा परिणाम म्हणून किमान २ अंश सेल्सिअस इतके तापमान कमी राहू शकते, असे आढळून आले आहे.

विदर्भ, खान्देश किंवा मराठवाड्याच्या तुलनेत पुणे आणि सोलापूरचे तापमान हे नेहमीच किमान एक वा दोन अंश सेल्सिअसने कमी असते. असे आढळून आले आहे. त्याखालोखाल सातारा, सांगली आणि कोल्हापूरचे तापमान असते असे आढळून आले आहे. गतवर्षी विदर्भ आणि खान्देश तापला असताना पश्चिम महाराष्ट्रात त्याचा प्रभाव कमी जाणवत होता. विदर्भात सर्वाधिक तापमान ४ अंशापर्यंत गेले असताना सोलापूरचे तापमान सर्वाधिक ४५ अंशापर्यंत होते. तर सांगली, कोल्हापूरला ४० ते ४२ अंशापर्यंत होते. साखरपट्ट्यीतल वाहनांमध्ये इथेनॉलचा वापर वाढला तर सर्वाधिक तापमान आणखी किमान दोन अंशानी कमी राहू शकेल.



# ज्वारीचा भाव वाढतोय



एकेकाळी गरिबांचे धान्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्वारी, बाजरी आणि नाचणीला सध्या बाजारात अक्षरशः सुगीचे दिवस आले आहेत. पण बाजी मारली आहे ज्वारीने आहाराबद्दल अतिजागरूक होत चाललेल्या शहरी नागरिकांमध्ये ज्वारीबद्दलचे आकर्षण वाढत आहे.

गेली काही वर्षे ज्वारीचे भाव हे गव्हाच्या खाली असत. पण आता हे भाव गेल्या तीन वर्षात तिप्पट झाले असून त्यांनी गव्हालाही मागे टाकले आहे. आरोग्याबद्दल दक्ष होत चाललेल्या पिढीसाठी कंपन्या मार्केटिंगची नवनवी तंत्रे वापरून दररोज नवी उत्पादने बाजारात आणत आहेत. सध्या त्यात मिश्र धान्याचे ब्रेड बिस्किटे, दोसे, असे नाविन्यपूर्ण पदार्थ दिसतात. ब्रिटानियाने न्यूट्रीचॉइस ही मिश्रधान्याची बिस्किटेही काढली आहेत. ओटलाही या धान्यांपाठोपाठ मागणी आहे. या कंपनीचा गेल्या सहा महिन्यांतला गव्हाशिवाय इतर धान्यांचा वापर ४५ टक्क्केनी वाढला आहे. त्यातही ओटही मागणी जास्त आहे. आयटीसी या कंपनीने मिश्र धान्यांचा आशीर्वाद आटा बाजारात आणला आहे. यात गहू, सोया, हरभरा डाळ, ओट, मका या धान्यांचा समावेश आहे.



आयटीसीचा मिश्र आट्याचा खप बाजारात तब्बल तीन चार पटींनी वाढतो आहे, असे या कंपनीचे

मुख्य कार्यकारी अधिकारी चिंत्रजर धर म्हणाले. पण घाऊक बाजाराची मागणी पूर्ण करण्याइतके उत्पादन ते करू शकलेले नाहीत.

**ज्वारी जोरातः** ज्वारीपासून तयार केलेल्या १८ पदार्थांवुर सध्या काम सुरू आहे. त्यांत ज्वारीपासून बनवलेली इडली, पास्ता आणि बिस्किटांचा समावेश असल्याची माहिती हैदराबदाच्या ज्वारी संशोधन संस्थेचे संचालक जे व्ही. पाटील म्हणाले. ज्वारीचे पोषणमूल्य उच्च आहे. शिवाय तिच्यात फायबरचे प्रमाण मोठे आहे. डायबिटिस, संधीवात यांच्या मुकाबल्यासाठी तिचा आहारात समावेश असणे महत्वाचे आहे. दात आणि हाडांच्या आरोग्यासाठीही ज्वारी महत्वाची आहे.

गव्हाशी बरोबरीः ज्वारीमध्ये प्रोटीन्स, कार्बोहायड्रेट्स आणि फॅट्सचं प्रमाण गव्हापेक्षा अधिक असते. लाइफ स्टाइलशी संबंधित विकारांमुळे ज्वारीची लोकप्रियता वाढत असल्याचे त्या म्हणाल्या. महाराष्ट्रात उत्पादन घटलेः महाराष्ट्र एके काळी ज्वारीचे उत्पादन सर्वाधिक होते. मात्र आता त्यात घट झाली आहे. खरिप ज्वारीच्या लागवड क्षेत्रात ९ लाख हेक्टर्सने घट झाली आहे. १९७० मध्ये ते १६ लाख हेक्टर होते. रब्बीचे क्षेत्र कायम असले तरी, उत्पादनात मात्र ३५ ते ४० टक्क्यांनी घट झाली आहे,

# सहकारला मारक

मुंबई : आर्थिक पाहणी हा प्रामुख्याने एक आर्थिक दस्तावेज असल्याने राज्याच्या अर्थविभागाचे विश्लेषण त्यात अनूस्यूत असते. परंतु गेल्या महिन्यात सादर झालेल्या आर्थिक पाहणीत, राजकीयदृष्ट्या सोय पाहून काही गोष्टींची चलाखी केलेलेही दिसून येते. आर्थिक पाहणीतील आणि पर्यायाने राज्याच्या अर्थकारणाच्या सहकार प्रवाहातील उण्या - पुऱ्या बाजूंविषयी हे विश्लेषण

अर्थसंकल्प मांडला जाण्यापूर्वी सादर होणारी आर्थिक पाहणी ही अनेकांगाने महत्वाची असते. अर्थव्यवस्थेपुढील समस्या व आव्हानाचा त्यात परामर्श घेतला जातो. त्यावरील ताबडतोबीच्या तसेच दीर्घ पल्ल्याच्या उपाययोजनाही त्यातून सुचविल्या जातात. शिवाय पुढील वर्षीचे भाकीतही त्यातून केले जाते. त्याउलट कोणत्याही विश्लेषणाचाही केवळ आकडेमोड असलेला अर्थसंकल्प हा खरे तर एक राजकीय अर्थविभागाचे विश्लेषण त्यात अनूस्यूत असते. परंतु गेल्या महिन्यात सादर झालेल्या आर्थिक पाहणीत, राजकीयदृष्ट्या सोय पाहून काही गोष्टींची चलाखी केलेलेही दिसून येते. याचे ठळक उदाहरण द्यायचे झाल्यास, या पाहणीत राज्यातील सहकारी संस्थापैकी खरोखरीने नफा कमावत असलेल्या संस्थांचा तपशील देणे जाणूनबुजून टाळले गेले आहे. महाराष्ट्रात एकंदर दोन लाख १८ हजार ३२० सहकारी संस्था आहेत. यापैकी प्रत्यक्ष लेन देनीचा व्यवहार करणाऱ्या संस्थांचे प्रमाण २०.७ टक्के इतकेच आहे. उर्वरित

# गरीबांवर लक्ष ठेवण्याचा

## भारताचा जागतिक बँकेला सल्ला

दिल्ली : विकसनशील देशांसाठी अतिरिक्त गुंतवणुकीचे प्रवाह वाढविण्याची मागणी करतानाच भारताने गरिबांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवून आणणारी धोरणे जागतिक बँकेचा मूलमंत्र असायला हवी, असे म्हटले आहे.

जागतिक बँकेच्या विकास समितीच्या बैठकीत भारताने ही भूमिका मांडली, असे आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव आर. गोपालन यांनी सांगितले. कार्यपध्दती कोणत्याही स्वरूपाची असेल, मग भलेही ती प्रांतवार किंवा विभागावर असेल तसेच नवीन उत्पादनांच्या डिझाईनचा मुद्दा किंवा आधुनिकीकरण वा प्रशासकीय सुधारणेचा मुद्दा असेल सर्वांचे लक्ष्य एकच असायला वहे आणि ते म्हणजे या बदलांव्दारे सर्व ठिकाणच्या गरिबांचे जीवन सुधारावे. विकासाचे आव्हान असलेल्या काही देशांना गुंतवणुकीच्या मर्यादेमुळे अपुऱ्या निधीचे संकट भेडसावत आहे.

अशा प्रकारच्या समस्येत बँकेला गुंतवणूक प्रवाहात सातत्य ठेवण्याची आवश्यकता आहे. विद्यमान तेजीचा ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमतीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. कारण, जग संकटातून जात असताना किमती वाढत आहेत. किमतीत चढउतार ही दीर्घकाळ चालणारी बाब आहे. अन्नधान्याच्या किमती वाढण्यास कारणीभूत असलेल्या घटकांवर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे, त्यामुळे ही समस्या सोडवण्यासाठी धोरणात्मक सुधारणा घडवून आणता येऊ शकेल, असेही ते म्हणाले.



मी सगळीकडे शोधलंय साहेब! पण गेल्या तीन वर्षांपासून हे अवाढव्य खोदकाम आपण नेमकं कशासाठी करतोय याची फाईलच सापडत नाहीये!!!



**शिरोली पुलाची : खंडपीठाच्या मागणीसाठी आंदोलकांनी महामार्गावर ठिय्या मांडला.**

# खंडपीठासाठी महामार्ग रोखला

शिरोली पुलाची : मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरात व्हावे या मागणीसाठी आज कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनसह सर्व पक्षांच्या वतीने सांगली ङ्क ाटा येथे महामार्ग रोखण्यात आला. सुमारे तासभर महामार्ग रोखल्याने सर्वच वाहतूक तब्बल दोन तास विस्कळित झाली. आंदोलनाने शासनाला जाग आली नाही तर मुंबई उच्च न्यायालयाचे कामकाज बंद पाडू, असा इशारा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अजित मोहिते यांनी दिला.

कोल्हापुरात खंडपीठ स्थापन व्हावे, यासाठी बार असोसिएशन प्रयत्नशील आहे. शासकीय अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधींना या मागणीचा पाठपुरावा केला. मात्र शासकीय पातळीवर याबाबत कोणतीही कार्यवाही झा-लेली नाही. त्यामुळे खंडपीठाच्या मागणीसाठी बार असोसिएशनसह सर्व पक्षांनी एकत्रित आंदोलन केले. त्याला विविध तालीम संस्था, मंडळांनीही साथ दिली. त्याचा पहिला टप्पा म्हणून सांगली ङ्क ाट्यावर महामार्ग रोखण्यात आला. बार असोसिएशनच्या सदस्यांनी महामार्ग व सेवामार्गावर वाहने आडवी लावून रस्ता बंद केला. यामुळे महामार्गासह सेवामार्गावरील वाहतूक पूर्ण ठप्प झाली.

'कोल्हापूरला खंडपीठ मिळालंच पाहिजे', 'खंडपीठ आमच्या हक्काचं', 'कोण म्हणतंय देत नाही, मिळवल्याशिवाय राहात नाही' अशा घोषणा आंदोलनकर्ते देत होते. पोलिसांनी सर्व आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन महामार्ग वाहतुकीसाठी खुला केला. करवीरचे पोलिस उपअधीक्षक जयवंत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्त तैनात होता. या वेळी महापौर वंदना बुचडे, शिवसेनेचे विजय देवणे, राष्ट्रवादीचे शहर अध्यक्ष आर. के. पोवार, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश जाधव, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे, ॲड. धनंजय पठाडे, ॲड. शिवाजी राणे यांची भाषणे झाली. आंदोलनात जिल्हा परिषद सदस्य जयकुमार कोले, महेश चव्हाण, अशोक पाटील, गिरीश खडके, अजित चव्हाण, माणिक शिंदे, शिवाजी ढवण, मारुती भागोजी, रामचंद्र खेडेकर, गणेश मुंगळी, रघुनाथ पाटील, माणिक मुळीक, संपतराव पोवार, ए. एच. पाटील, अरुणा ढिसाळ, दीपा पेडणेकर, सुजाता चौगुले, मीना पोवार, कल्पना माने, संपीता परब, इंदिरा राजेपांढरे, ललिता चांदयाम, संज्योती म्हामूलकर यांच्यासह मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते.

# राजगिऱ्याचे उत्पादन फायदेशीर

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

राजगिरा पालेभाजी महाराष्ट्रात सर्वसामान्य लोकांना परिचीत आहे. या भाजी सर्व हंगामात लागवड करता येते. लोकांना पालेभाज्यापेक्षा राजगीरामध्ये प्रथिने, क्षार, खनिजे व जीवनसत्त्वे यांचे प्रमाण जास्त आहे. राजगिऱ्याच्या बियांच्या लाह्या किंवा पीठ तयार करून उपवासाचे अन्नपदार्थ तयार करता येतात. राजगिरीच्या लाडू, वडी, चिक्की यांचा उपवासाचे पदार्थ म्हणून उपयोग केला जातो. राजगिरीची भाजी रक्तशुद्धीसाठी उपयोग होते. त्वचेवरील व्रण जाण्यासाठी पानांचा लेप लावला जातो. राजगिरीच्या भाजीत म्हातारपण पुढे ढकलण्याचाच गुणधर्म आहेत. म्हणून राजगिरीच्या पालेभाजीची लागवड करून अधिक उत्पादन मिळविण्यासाठी सविस्तर माहिती खाली दिली आहे.

१) हवामान व जमिनः राजगिरीच्या पालेभाजीच्या वाढीस उष्ण हवामान चांगले मानवते. सामान्यपणे १६ अंश पासून ते ३५ अंशापर्यंत या तापमानात भाजीची लागवड चांगली करता येते. या पालेभाजीची लावगड वर्षभरात तिन्ही हंगामात करता येते. चांगली निचऱ्याची जमिन लागवडीसाठी निवडावीत.

२) पूर्वमशागतः जमिनीची एकादी नांगरट करून दोन कुळवाच्या पाळ्या घालून चांगली जमिन तयार करून घ्यावी. पाळी देण्यापूर्वी चांगले



कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत हेक्टरी २५ ते ३० बैलगाड्या जमिनीत चांगले मिसळून घ्यावे. जमिनीच्या उताऱ्यानुसार सपाट वाफे तयार करून घ्यावे.

३) बियाणे व लागवडः राजगिरा भाजीची लावगड खरीपसाठी जून, जुले, महिन्यात लागवड करावी. लागवडीसाठी कोईमतूर, चौलाई सारखे सुधारीत जाती लागवडीसाठी निवड करावी. ३ बाय २ असे वाफे तयार करावेत. त्यानंतर पेरणी १ सेमी खोलीवर १५ सेमी बारीक सरी घेऊन बि पेरावेत. बियाणे बारीक असल्याने माती अथवा बारीक वाळू मिसळून बियांची हाताने पेरणी करावी, अंदाजे हेक्टरी १.५ ते २ किलो बियाणे पुरेसे होतात. पेरणीनंतर लागलीच हलके पाणी द्यावे. त्यानंतर गरजे प्रमाणे पाणी द्यावे. वेळोवेळी खुरपण देऊन पीक तणमुक्त ठेवावे.

४) खतेः या राजगिरा भाजीपाला पिकास रासायनिक खते हेक्टरी ३० किलो नत्र, ५० किलो पालाश लागवडीच्या वेळी द्यावे. या पिकावर मावा व नागअळी यांचा प्रादुर्भाव आढळून आल्यास मेलॅथिन ५० टक्के प्रवाही १० मिली, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी,

५) काढणी व उत्पादनः राजगिरा बि पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांत काढणीस तयार होते. ही पालेभाजी मुळासकट उपटून गड्या बांधून विक्रीसाठी पाठवावी. भाजी कापणी उन्हात करू नये. या पालेभाजीपासून हेक्टरी ७५ ते ८० क्विंटलपर्यंत उत्पादन ३० ते ३५ दिवसांत मिळू शकते. तरी शेतकऱ्यांनी भाजीपाल्याची लावगड करून फायदा घ्यावा.